पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक १९/०५/२०१९

## नक्षलवाद्यांनी पुकारलेल्या बंदला जनतेकडुन ठिकठिकाणी प्रचंड विरोध

आज रोजी नक्षलवाद्यांनी गडचिरोली जिल्ह्यात जनतेला बंद पाळण्याचे आवाहन केले होते. नक्षलवाद्यांच्या या आवाहनास गडचिरोलीतील जनतेने तीव्र विरोध दर्शवित ठिकठिकाणी नक्षलवादींनी लावलेल्या बॅनर्सची होळी केली. यावेळी उपस्थित नागरिकांच्या नक्षलवाद मुर्दाबाद, भारत माता कि जय यांसारख्या घोषणांनी परिसर दणाणुन निघाला.

गडचिरोली जिल्ह्यात मागील महिन्यात झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुक - २०१९ च्या मतदान प्रक्रियेवर नक्षलवाद्यांनी येथील जनतेला बहिष्कार टाकण्याचे आवाहान केले होते. परंतु येथील स्थानिक जनतेला नक्षलवाद्यांच्या क्रूरतेची व त्यांच्या दुटट्रपिपणाची भुमिका चांगलीच माहीती असल्याने दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेने स्वयंप्रेरणेने घराबाहेर पडुन आपला मतदानाचा हक्क बजावला. यामुळे संपुर्ण महाराष्ट्र राज्यात गडचिरोली जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी सर्वाधिक नोंदली गेली होती. यामुळे नक्षलवाद्यांना जनता विरोध करत आहे हे स्पष्ट झाले होते.

आज नक्षलवाद्यांनी एटापल्ली तालुक्यातील गुरुपल्ली गावानजिक झाडे पाडुन, बॅनर लावुन बंद पाळण्याचे आवाहन केले होते. या घटनेला येथील जनतेने तिव्र विरोध दर्शवित नक्षलवाद्यांनी रस्ता अडवुन ठेवण्यासाठी पाडलेली झाडे हटवुन लावलेल्या बॅनर्स ची होळी केली. त्याचबरोबर भामरागड तालुक्यातील आरेवाडा येथे देखील नक्षल्यांनी बॅनर्स लावुन बंद चे आवाहन केले होते. तेथील जनतेने हे बॅनर्स काढून त्याची होळी करत बंद पुकारणारे तुम्ही कोण? असा खडा सवालच नक्षल्यांना केला आहे.

गडचिरोली दुर्गम व अतिदुर्गम आदिवासी भागातील जनतेने नक्षलवाद्यांचा 'मारेकरी' असा उल्लेख करत आजपर्यंत तुम्ही किती निष्पाप नागरीकांच्या जीव घेतला आहात? असा प्रश्न उपस्थित करत नक्षलवाद्यांनो तुम्ही आपल्या फायद्यासाठी आदिवासी बांधवांचा विकास होवु देत नसुन तुम्हाला आदिवासी बांधवांच्या विकासाशी काही देणे घेणे नाही. तुम्ही फक्त स्वतःच्या तुंबड्या भरण्यासाठी हे सर्व करीत असल्याचे म्हटले आहे. गडचिरोलीतील जनतेने ठिकठिकाणी नक्षलवाद्यांच्या धिक्कार केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

गडचिरोली पोलीस दल हे गडचिरोलीच्या विकासासाठी तसेच गडचिरोलीतील जनतेच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असुन जनतेकडुन नक्षलवाद्यांना होणारा तिव्र विरोध हे नक्षलवाद विरोधात एक भक्कम पावुल नक्कीच ठरेल. त्याच बरोबर जनतेने नक्षलवाद्यांना गावबंदीची मोहीम हाती घ्यावी. याकामी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल असे आवाहन पोलीस अधिक्षक,श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी केले आहे.


गुरुपल्ली
प्राथमिक आरोग्य
उप. केंद्र.

